# महिला वसतिगृहात सायबर सुरक्षेबाबत मार्गदर्शन

दिव्य मराठी 04-12-2022

**प्रतिनिधी** | अकोला

जुन्या शहरातील मातृ मंदिर महिला वसतिगृहात सायबर क्राईम आणि सुरक्षेबाबत मार्गदर्शनाचा कार्यक्रम नुकताच घेण्यात आला. सायबर क्राईम कशा प्रकारे घडतात, सोशल मीडियाच्या माध्यमातून ऑनलाईन फसवणूक कशी होते याबाबत शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालयाच्या शीतल साखरे आणि नेहा टेरे यांनी वसतिगृहातील विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले.

मुलींनी ऑनलाइन फसवणुकीपासून कसे दूर राहावे, कोणती काळजी घ्यावी याविषयी सविस्तर माहिती या कार्यक्रमात देण्यात आली. हा मार्गदर्शनाचा कार्यक्रम पुणे आणि महाराष्ट्र सायबर सेल, मुंबई यांच्या सहयोगाने महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जगदीश साबू आणि भौतिकशास्त्र विभागाचे डॉ. हरिदास खरात यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित केला होता. यावेळी वसतिगृहाच्या संचालिका प्रा. डॉ. प्रियाकुमारी धाबे यांनी मोबाईल आणि सोशल मीडियाचा वापर कमीत कमी आणि योग्य पद्धतीने करण्याचे आवाहन उपस्थित विद्यार्थिनींना यावेळी केले. सायबर सुरक्षा टिप्स असलेले माहितीपत्रक या कार्यक्रमात वाटप केले. यावेळी श्रद्धा तेलंग आणि विद्यार्थिनी उपस्थित होत्या.